**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २१८ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.जी.एन. भस्मे,
गितांजली कॉलनी,
विदयाभारती कॉलेज जवळ,
कॅम्प, अमरावती

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३,
महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई -०१.
२. जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य, विश्वकर्मा अभियांत्रिकी महाविदयालय,
बिबवेवाडी, पुणे.

**(आदेश पारीत दिनांक २४/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.जी.एन. भस्मे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे प्रभारी सहसंचालक, तंत्रशिक्षण, अमरावती श्री.एस.व्हि. साखरकर हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

सदर प्रकरणात दिनांक १८/११/२०१० रोजी प्रथम अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यादिवशी प्रबंधक हजर होते. अर्जदार गैरहजर होते. आज हया आयोगासमोर व्दितीय अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली आहे. त्यात अर्जदाराला पुन्हा सुनावणी देण्याबाबत अपिलीय अधिकारी यांनी मान्य केले आहे. दिनांक १४/१२/२०१० रोजी तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे सकाळी १२.०० वाजता सुनावणी देण्यात यावी व अर्जदाराचे म्हणणे ऐकुण घेऊन त्याच दिवशी आदेश पारित करुन आदेशाची प्रत अर्जदाराला पुरविण्यात येईल. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार व्दितीय अपिल ९० दिवसात हया आयोगासमोर करु शकतील.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.२१९ / २०१०**
**अपिल क्र.२२० / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.गजानन किसनराव भडके,
श्री साईश्रध्दा, गजानन नगर, पिंपळगांव,
ता.जि. यवतमाळ.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, यवतमाळ, जि.यवतमाळ.

२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत, पिंपळगांव,
पंचायत समिती, यवतमाळ, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक २४/११/२०१०)**
**(सुधारीत आदेश दिनांक / /२०११)**
**-निर्णय-**

अपिल क्रमांक २१९/२०१०, २२०/२०१० मध्ये आदेश पारित दिनांक २४/११/२०१० चे जा.क्र. ७२०३ दि. ०९/१२/२०१० चा आदेश अधिक्रमीत करुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.गजानन किसनराव भडके हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, यवतमाळ श्री.बि.वाय. काचेवार हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत पिंपळगांव श्री.एस.एम. युवनाते हे हजर आहेत.

अपिल क्रमांक २१९ मध्ये अर्जदाराने दिनांक २७/१०/२००९ रोजी माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केला व त्यामध्ये २० फेब्रुवारी २००८ पासुन दि.२७/१०/२००९ पर्यंत संबंधित ग्रामपंचायत यांच्या मासिक सभा व ग्रामसभा झाल्यात, त्या कामकाजाबाबतचे रजिस्टर, हजेरी पुस्तक तसेच नोटीस या बाबतची माहिती मागितली. तसेच अपिल क्रमांक २२० मध्ये प्रपत्र 'अ' नुसार दिनांक २७/१०/२००९ ला ग्रामपंचायतचे सामान्य फंड, १२ व्या वित्त आयोग, ग्रामीण पाणि पुरवठा, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत केलेला खर्च तसेच उपरोक्त हेडवर प्राप्त अनुदान, कर वसुलीतुन जमा झालेल्या रकमेचे कॅशबुक तसेच बिले व पावत्या इत्यादीची माहिती मागितली. तसेच सन २००२ या आर्थिक वर्षापासुन जे ऑडीट करण्यात आले असल्यास त्याचे रिपोर्ट, आक्षेप इत्यादी बाबतची माहिती मागितली. त्यानंतर अर्जदाराला माहिती देण्यात आली नसल्याने अर्जदाराने प्रपत्र 'ब' नुसार गटविकास अधिकारी, पंचायत समिती, यवतमाळ यांचेकडे दिनांक १५/१२/२००९ रोजी प्रथम अपिल दाखल केले. दोन्ही प्रकरणात प्रथम अपिल दाखल केले. अपिल क्रमांक २१९ मध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराला ग्रामपंचायतच्या रजिष्टर बाबतची माहिती विनाशुल्क ३ दिवसाचे आंत पुरवावी तसेच अपिल क्रमांक २२० मध्ये जी माहिती मागितली ती १५ दिवसाचे आंत पुरविण्यात यावी असा आदेश देण्यात आला. त्यानंतर अर्जदाराने अपिल क्रमांक २१९ व २२० या दोन्ही प्रकरणात हया आयोगासमोर दिनांक २५/०२/२०१० रोजी व्दितीय अपिल दाखल केले व त्यात हया आयोगासमोर अशी तक्रार केली की, विहीत मुदतीत माहिती न देणे, प्रथम अपिल विहीत मुदतीत निकाली न काढणे, सुनावणी ठेवुन सुध्दा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उपस्थित न राहणे ही तक्रार व्दितीय अपिलात नमुद आहे.

हया दोन्ही प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी यांनी दिनांक ३१/०१/२०१० रोजी दिलेल्या प्रथम अपिलातील निर्णयाचे अवलोकन केले असता सदर सुनावणीस अपिलार्थी गैरहजर असुन उत्तरवादी हे हजर होते. मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे प्रथम अपिल अर्जदाराने दाखल केले होते व माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना दोषी ठरवुन ते शास्तीस पात्र आहे असे म्हटले आहे. सदरच्या प्रकरणात ११ महिन्याचा कालावधी उलटुनही माहिती

दिलेली नाही ही बाब निश्चितच अधिनियमाचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे दोन्ही प्रकरणात तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.मोरे व त्यानंतर कार्यरत असलेले श्री.ढेंगे हे सदर प्रकरणात दोषी आढळुन येतात. कारण त्यांनी सुध्दा त्यांचे कालावधीत अर्जदाराला माहिती पुरविण्याचे दृष्टिने प्रयत्न केले नाही. सदर प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने श्री.बि.वाय. काचेवार हे हजर आहेत व त्यांनी सुध्दा अर्जदाराला माहिती न दिल्याची बाब मान्य केली आहे. तसेच अर्जदाराने आज रोजी हया प्रकरणात निवेदन दाखल केले आहे व त्यात संबंधित तत्कालीन सचिव हे जाणुन-बुजून व त्यांचा भ्रष्टाचार उघडकीस येवु नये म्हणुन माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहे. दुसरे अपिल दाखल होवुन १ वर्षाचा कालावधी होवुन सुध्दा माहिती दिली नाही. तसेच हया प्रकरणात सध्या कार्यरत असलेले श्री.एस.एम. युवनाते हे हजर आहेत. त्यांचे म्हणण्यानुसार ते २ महिन्यापासुन कार्यरत आहे व त्या काळातील कोणताही कार्यभार त्यांना दिला नाही त्यामुळे ते माहिती देऊ शकले नाही.

तरी, हया बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुध्दा लक्ष घालुन संबंधित सचिवाविरुध्द योग्य ती चौकशी करावी. तसेच शासकीय कागदपत्रे बदली होवुन सुध्दा हस्तांतरित न करणे ही बाब नक्कीच दखलपात्र गुन्हयाची आहे व त्यासाठी आवश्यक असल्यास पोलीसांकडे तक्रार करुन संबंधितांकडुन सदरच्या ग्रामपंचायतची कागदपत्रे जप्त करुन घ्यावे व या सर्व बाबींची त्यांचे काळातील कार्याबाबतची चौकशी करुन पैशाचा विनीयोग नियमानुसार केला किंवा नाही ही बाब तपासुन पहावी. अर्जदाराचे म्हणण्यानुसार याआधी माहिती आयुक्त, नागपुर यांना संबंधित तत्कालीन सचिव श्री.मोरे व श्री.ढेंगे या दोघांविरुध्द अपिल क्रमांक १२३१/२०१०, १२३२, १२३३, १२३४ व १२३५ या अपिलात माहिती न मिळाल्याने अर्जदाराने ६२/२०१० तक्रार दाखल केली होती व त्यात अर्जदाराची तक्रार मंजुर करुन अर्जदाराला विनाशुल्क माहिती देण्याबाबत आदेश केले होते व संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर रू. १०००/- दंड लावण्यात आला असुन माहिती न दिल्यास २५०००/- रु दंड लावण्यात येईल असे म्हटले आहे. त्या प्रकरणात सुध्दा अजुनपर्यंत माहिती मिळाली नाही म्हणुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यवतमाळ यांनी हया प्रकरणात लक्ष घालणे आवश्यक आहे. हा आयोग सुध्दा तत्कालीन दोन्ही सचिव यांना अर्जदाराच्या अर्ज प्रपत्र 'अ' दिनांक २७/१०/०९ नुसार माहिती न पुरविल्यामुळे त्यांना दोषी ठरवुन त्यांना लागु असलेली शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी यांना करण्यात येते. तरी सदर प्रकरणात शिफारशीनुसार कार्यवाही करावी.

**आदेश**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी वरील आदेशात शिफारशीनुसार संबंधित दोन्ही सचिव, ग्रामपंचायत, पिंपळगांव यांचे विरुध्द त्यांचे सेवा नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करुन ३ महिन्याच्या आंत तसा अहवाल आयोगास पाठवावा.
२. एखादया सक्षम अधिका-या मार्फत आज कार्यरत असलेले सचिव यांना २ महिने होवुन सुध्दा कार्यभार हस्तांतरित केला नाही तरी हया बाबत आपले स्तरावर योग्य ती चौकशी व तसेच शक्य असल्यास पोलीसांकडे तक्रार करुन शासकीय कागदपत्रे देण्यास बाध्य करण्यात यावे.
३. तसेच अर्जदार यांना झालेल्या शारीरिक व मानसिक त्रासाबाबत दोन्ही अपिल मिळुन रु.५०००/- (रु.पाच हजार फक्त) संबंधित प्राधिकरणाने दयावे व तसेच सदरची रक्कम जे जबाबदार असतील त्यांचेकडुन वसुल करण्याबाबत आपले स्तरावरुन योग्य तो आदेश पारीत करावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यवतमाळ.

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.२२४/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
मंसुरखान कमरोद्दीनखान,
मु.कमेला परिसर, वार्ड क्र.३, बुलडाणा,
ता.जि. बुलडाणा.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
बुलडाणा, जि.बुलडाणा.

२. जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक, ग्रामीण विकास यंत्रणा,
जिल्हा परिषद कार्यालय, बुलडाणा
जि.बुलडाणा

**(आदेश पारीत दिनांक २४/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी मंसुरखान कमरोद्दीनखान हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे सहाय्यक प्रकल्प अधिकारी, (कृषी), जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, बुलडाणा श्री.ए.पी. गायकवाड हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, बुलडाणा श्री.जी.पी. देवकर हे हजर आहेत.

अर्जदाराने ४ मुद्दयांची माहिती मागितली होती. अर्जात नमुद केल्यानुसार विषयांकित माहिती, चौकशीची कागदपत्रे, तक्रार चौकशीचा कार्यपुर्ती अहवाल इत्यादी बाबत माहिती मागितली होती. सदरची माहिती अर्जदाराने २ सप्टेंबर २००९ रोजी मुख्य कार्यपालन अधिकारी, जि.प. बुलडाणा यांना ग्रामपंयाचत, जयपुर ता.मोताळा, जि.बुलडाणा यांना घरकुल संबंधी ज्या लोकांचे लाभार्थी म्हणुन नांवे आहे त्यांना घरकुल मिळाले नाही व ज्यांचे नांव नाही त्यांना घरकुल देण्यात आले तसेच ज्या लोकांचे नांवे चेक आहे त्यांना पैसा मिळाला नसुन चेक परस्पर वटविण्यात आला. याबाबत तक्रार केली व त्याबाबत जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेकडे सुध्दा तक्रार केली होती. दिनांक ०७/०९/२००९ रोजी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, बुलडाणा यांचेकडे पत्र लिहुन अर्जदाराच्या दिनांक ०२/०९/२००९ च्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल त्यांचे कार्यालयात पाठवा असे म्हटले.

वरील बाबी लक्षात घेता अर्जदाराने दिनांक १९/०९/२००९ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन कार्यवाही बद्दल झालेला चौकशी अहवाल मागितला होता. परंतु सदर अहवाल अस्तित्वात आलाच नाही कारण त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, बुलडाणा यांनी दिनांक ०१/११/२०१० ला गटविकास अधिकारी, पं.स. मोताळा यांना चौकशी करण्याबद्दल आदेश दिला होता व त्यानुसार सदरच्या प्रकरणात चौकशी दिनांक ०६/१०/२०१० ला प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, बुलडाणा यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना चौकशी अहवाल पाठविला व त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी यांनी दाखल केलेला चौकशी अहवाल हयाबाबतची कागदपत्रे अर्जदारास दयावी व त्यानंतर अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार तक्रार करु शकतात. तसेच अर्जदाराच्या म्हणण्यानुसार घरकुल लाभार्थीच्या यादीनुसार ८५ लोकांची यादी आहे व ९५ लोकांचे चेक काढले आहे.

तसेच अर्जदाराचे नातेवाईक अमीनाबी शेख हया सुध्दा लाभार्थी आहे व त्यांचे नांवे सुध्दा १० व १५ हजार रु. चा चेक काढला आहे. परंतु तो त्यांचे खात्यावर जमा झालेला नाही अशी अर्जदाराची तक्रार आहे. तरी

ही बाब गंभीर आहे. हयाबाबत अर्जदाराने बँकेत चौकशी केली असता संबंधित ग्रामसेवक व सरपंच यांनी संगनमत करुन खाते नांवे दाखवुन पैसे काढल्याचे सांगण्यात आले. ही बाब सत्य असेल तर हया प्रकरणात चौकशी होणे आवश्यक आहे. तरी, हया प्रकरणात एखादया सक्षम अधिका-यामार्फत चौकशी २ महिन्याचे आंत करुन अहवाल अर्जदारास पाठवावा तसेच लाभार्थ्याच्या नांवाने निघालेले चेक त्यांच्या खात्यात जमा न झाल्याबाबत सरपंच व सचिव जबाबदार असतील तर त्यांचे विरुध्द कारवाई होईल.

खालील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बुलडाणा यांनी वरील शिफारशीनुसार संबंधित ग्रामपंचायत बाबत सक्षम अधिका-याकडुन २००७-०८, २००८-०९, २००९-२०१० या तिन्ही वर्षात दिलेल्या घरकुल वाटपाची बाबत चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बुलडाणा.

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २२५ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.वाघु भिवाजी भालेराव,
रा.खंडाळा खुर्द, पो.अडोळी,
ता.जि. वाशिम.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद कार्यालय, हिंगोली,
ता.जि. हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद, हिंगोली, ता.जि. हिंगोली.

**(आदेश पारीत दिनांक २४/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली श्री.एन.पी. धांडे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली श्री.जी.पी. डोल्हारे हे हजर आहेत.

अर्जदाराने जिल्हा परिषद, सामान्य प्रशासन विभाग, जि.हिंगोली अंतर्गत कार्यरत कर्मचारी श्रेणी १,२, ३ हे मुख्यालयी राहत असल्याबाबत संबंधित कार्यालयाकडे सादर केलेले दस्तऐवजाच्या छायांकित प्रती व मुख्यालयी राहत नसलेल्या कर्मचा-यांवर केलेल्या कार्यवाही अहवालाच्या छायांकित प्रती, ग्रामपंचायत प्राधिकरणाने मासीक सभेत तसेच ग्रामसभेत घेतलेल्या ठरावाच्या उपस्थिती पत्रकासह इतिवृत्ताच्या प्रती मागितल्या. अर्जदाराने मागितलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ७(९) खाली नाकारता येऊ शकते. माहितीचा कालावधी हा १९९३ ते २००९ पर्यंत म्हणजे जवळपास १६ वर्षाचा कालावधी आहे. अर्जदाराला ही माहिती न मिळाल्याने अर्जदाराने प्रथम अपिल अर्ज दि.११/१२/२००९ ला दाखल केला. सदर प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली. दिनांक २१/१२/२००९ व त्यानंतर दिनांक २५ /०१/२०१० रोजी पुन्हा संधी देण्याचे दृष्टिने सुनावणी ठेवण्यात आली व त्या अनुषंगाने पत्रव्यवहार सुध्दा केला परंतु अर्जदार गैरहजर राहिल्यामुळे अपिल नस्तीबध्द करण्यात आले. त्यानंतर अर्जदाराने हया आयोगासमोर दिनांक २७-०१-२०१० रोजी व्दितीय अपिल दाखल केले व आज सुध्दा अर्जदार गैरहजर आहेत. अर्जदाराने मागितलेली बरीचशी माहिती ही व्यक्तीगत माहिती आहे व वेगवेगळया कर्मचा-यासंबंधी आहे. माहिती देण्याकरिता जिल्हा परिषद मध्ये कार्यरत असलेले १, २, ३ श्रेणीचे ६००० कर्मचारी जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत आहे. तरी मागितलेली माहिती ही निश्चितच व्यापक स्वरुपाची असल्यामुळे प्रमाणाबाहेर साधनसामुग्री वळवावी लागत असल्यामुळे अर्जदाराने विशिष्ट स्वरुपात माहिती मागितली तर अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देणे शक्य

होईल.  अर्जदार आज रोजी गैरहजर असल्यामुळे शहानिशा होवु शकली नाही.  तरी, अर्जदार प्रथम अपिल व व्दितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर असल्याचे कारणाने अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**